# प्रकरण चौथे

## मोहन पाटील यांच्या कादंब-यांची वैशिष्ट्ये

# प्रकरण चौथे

## मोहन पाटील यांच्या कादंबऱ्यांची वैशिष्ट्ये

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या लघुकादंबऱ्या-तील आशयसूत्रे आणि व्यक्तिचित्रणांचा अभ्यास केला. हा अभ्यास करीत असताना त्यांच्या कादंबऱ्यात काही वेगळी वैशिष्ठ्ये जाणवतात. ही वैशिष्ट्ये रूढ मराठी कादंबरीपेक्षा वेगळी वाटतात. पाटील यांच्या कादंबरीत खेडेगावा-तील पाटीलकीत चावडीऐवजी पंचायत दिसते. त्यातून निर्माण झालेली सत्ता-स्थाने दिसतात. गावातील सत्तास्थानाने निर्माण केलेले ताणतणाव दिसतात. या ताणतणावातून पिळत गेलेले खेड्यातील जीवन दिसते.

माणसांचा गावगाडा आणि त्या गावगाड्याच्या चाकोरीतून उठणारा धुराळा पाटलांनी केवळ पाहिलेला नाही. तर प्रत्यक्ष अनुभवलेला आहे. ग्रामीण वातावरण व ग्रामीण माणूस यांचे आकलन लेखकाच्या ठिकाणी असलेले जाणवते. ग्रामीण जीवनाची सखोल जाणीव त्यांच्याकडे आहे. त्यांच्या लेखनात वास्तव आहे. कणखरपणा आहे. गांभीर्य आहे. जीवन तत्वज्ञान विषयक त्यांची दृष्टी चांगली आहे. त्यामुळे त्यांच्याजवळ कादंबरीकाराची गुणवत्ता आहे याची जाणीव होते. याबाबत डॉ. गो.मा. पवार म्हणतात की, "मानवी जीवनातील सनातन सत्य प्रकट करण्याचे सामर्थ्य लेखकात हवे. ते पाटील यांच्यात आहे. लेखकाच्या मनातील खंत मौलिक आहे. म्हणूनच त्यांच्या ठिकाणी श्रेष्ठ साहि-त्यिकाचे सामर्थ्य आहे."[१]

मोहन पाटील यांचा ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण वेगळा आहे. त्यांच्या कादंबरीत केवळ ग्रामीण परिसराचे वर्णन आलेले नाही, तर ग्रामीण मनाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कादंबरीत जाणवते. त्यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा वाचकासमोर साक्षात उभ्या राहतात. त्यामुळे त्यांच्या

लेखनात संवेदनशिलता जाणवते. पाटील यांच्या कादंब-यातील संवेदनशिलते-विषयी आपले मत व्यक्त करताना म.द. हातकणंगलेकर म्हणतात की, "या दोन्ही लघुकादंब-यातून जीवनाचे भेदक चित्रण केले आहे. ग्रामीण समाजजीवनातील मानवी रूपे, तिची जाणीव लेखकाला आहे. लेखकाचे अस्सल अनुभव आणि शोधक दृष्टी यामुळे हे अनुभव आणि चित्रण वास्तव ठरलेले आहे. त्यामुळे त्यांच्या कादंब-यातून संवेदनशिलता जाणवते."[२]

बदलत्या समाजरचनेमुळे गावगाडयाचे चक्र पुन्हा सरंजामशाही आणि जुलूमजबरदस्तीच्या चक्रव्युहात गुदमरते आहे. गावगाडा, शेतीवाडी, ग्रामपंचायत यांचा कारभार एकाच धनदांडग्या आणि मग्रुर अशा व्यक्तीकडे गेल्यावर काय घडते याचे दाहक व अंतर्मुख करणारे असे चिंतनीय दर्शन येथे घडते. सर्वच सत्ता एकाच व्यक्तीकडे केंद्रित होतात आणि नवे संदर्भ असलेली परिस्थिती निर्माण होते. अन्याय, अत्याचार जुलूम होतात. पण त्याचा उच्चार तोंडावाटे होऊ शकत नाही. परंपरागत गावकी भुईसपाट झालेली असली तरी जातपातीचे बुलंद तट उभे रहात आहेत. ही घालमेल, घुसमट व्यक्त करणा-या या कादंब-या आहेत.

पाटील यांच्या कादंब-यात सामाजिक जाणीव प्रकट झालेली दिसते. लोकशाहीत विकासासाठी निर्माण केलेले सर्व उपक्रम गावातील एखाद्या माणसाच्या हाती एकवटतात. त्यामुळे त्यांचा अधिकार सरंजामशाहीतील कुलप्राप्त पदापेक्षाही भयंकर स्वरूप धारण करतो आणि त्यांच्या भयावह सावलीत शंका ओठावर आणतो तो जमीनदोस्त होतो. हे सारे आधुनिक लोकशाहीच्या चौकटीत होते. त्यामुळे सामान्य माणसांच्या जगण्याला अगतिकत्व येते.

"त्यांच्या कादंब-यात समूहजीवनाचा चित्रफलक गडद होतो. पण भडक कधी होत नाही. कारण लेखक घटनामध्ये गुंतून न रहाता त्यामधून दिसणा-या

व्यक्तिमनाची घुसमट, आणि ग्रामीण जीवनाचा परिघ मांडण्याचा प्रयत्न केलेला असतो." [3] असे मत पुष्पाभावे यानी व्यक्त केले आहे.

"लिगाड"मधील कथानक शिकलेल्या शहरगावाला नोकरीसाठी जाऊन परत आलेल्या आणि शेती करू लागलेल्या रघूच्या नरजेतून पाहिली जाते. या कादंब-यातील कथानकामध्ये निवेदकाची स्वत:ची एक दृष्टी आहे. या दृष्टीतून तो माणसांच्या शरीराकडे, शेताकडे आणि पाण्याकडे पहातो. त्यामुळे निवेदनाचा ओघ न अडवता कथानकअधिक अर्थपूर्ण करीत वर्णने येतात. एका बाजूला सोसायटी, जॉकवेलने पुरवले जाणारे पाणी हे ऊसाच्या शेती-भोवतीचे जगणे. तर दुस-या बाजूला भावकीचे, जातपातीचे, वाळीत टाकण्याचे सरंजामशाही जगणे अशा दुहेरी स्वरूपात जीवन विभागलेले दिसते. या दोन्ही जगण्याचे लगाम सत्ताप्रमुखांच्या हाती एकवटलेले दिसतात.

गावच्या वातावरणात पाटाच्या पाण्याला केंद्रस्थान प्राप्त झालेले दिसते. पाटाचे पाणी विहिरीत सोडणा-या दाजीतात्यांच्या मनगटशाही-पुढे कोणी काही करू शकत नाही. गावातील तरूण धुसफुसत राहतात. प्रसंगी त्यांचा उद्रेकही केविलवाणा होतो. यापेक्षाही केविलवाणी झाले आहे ते बजरंगाचे घर. तरूण विधवेने प्रेम करण्याचा गुन्हा केल्याबद्दल तात्या तिला एक रात्र मळ्यात ठेऊन घेतात. अफवा मात्र प्रियकराबरोबर पळू गेली अशी होते. गावाला सत्य माहित असून देखील बजरंगाचे घर वाळीत पडते. दोन्ही कादंब-यात बलात्काराचे संदर्भ आलेले आहेत. ते केवळ वर्णनासाठी येत नाहीत. तर स्त्रीयांच्या मनावर झालेला परिणाम सांगत जातात. "लिगाड" मधील त्या बलात्कार प्रसंगानंतर पाहताना लेखक म्हणतात की,

"डोळयाला पदर लावून ती पालीसारखी, दगडी उंच भिंतीला चिकटून उभी राहिली. मला तिच्याकडे पाहवेना. गोरीतून उठून शाकीचं भूत माझ्या पुढयात उभं राहिलं की काय ? फुलासारखी गोरीपान शाकू पिकुटलेली दिसत होती. तिचे मोठे बोलके डोळे खोल गेलेले आणि गालावरचा पोपटानं फळाला टोच मारल्या-

साराखा उठून दिसणारा तो व्रण आता काळाकिट्ट डागणी दिल्यासारखा दिसतेला." (लिगाड, पृ. १५)

स्त्रियांवरील बलात्काराचा प्रसंग एखाद्या उत्तम दर्जाच्या कलाचित्रपटातील संकेतासारखा चौकटीसह उभा करतात. उदाहरणार्थ "खांदेपालट"मधील राजी मारूतीबरोबर लगट करताना नानांना सापडणे, नानांनी मारूतीला मारणे, राजीला उचलून ऊसात नेणे, तिच्याभोवती वासनेचे पाश आवळत जाणे, नंतर राजीला मारून विहिरीत फेकून देणे. हा प्रसंग नाटयमयरित्या घडत गेलेला जाणवतो.

खेडयात आता टी.व्ही. आला. शाळा, कॉलेजीस् आली. फॅशन आली. ऊसमळे आहेत. सगळे हिरवे आहे. समृध्दी आहे. परंतु या हिरव्या समृध्दीच्या पोटात जहरी कीड निर्माण होत आहे. जिव्हाळा, सहजीवन परस्पर सामंजस्य कोळपून गेलेले दिसते. समृध्दीच्या पोटात शांत पडत आहेत. जसा काही धोंडीनानांच्या पायाच्या घोटयाजवळ काळा इसबचा डाग.

धोंडीनाना म्हणजे समांतर सत्तास्थानाचे एक प्रतीक आहे. मराठी ग्रामीण साहित्यात कालपरवापर्यंत एक भाबडेपणा डोकाऊन जात होता.परंतु प्रत्यक्षात माणसातले चित्रविचित्रपण कडवेपण, कडवटपणा आणि वरून कणाखर दिसणाऱ्या स्वभावातला आपला हताशपणा हे सारे लेखकाच्या मनाला स्पर्श करत असल्याचे जाणवते. ग्रामीण इरसालपणा येथे विनोदाच्या अंगाने येत नाही. किंवा अनिर्बंध सत्ता-संपत्तीमुळे आलेली मग्रुरी इथे निवळत गेलेली दिसते. त्यामुळे कथानकाचा शेवट अनपेक्षित वेगळाच होत जातो.

"खांदेपालट" मधील कथानक गुंतागुंतीचा अनुभव मांडणारे आहे. ग्रामपंचायतीतील रोटेशन नाना आणि नानांचा मुलगा यांच्यातील खांदेपालट शक्य होत नाही. आपल्या मुलाचा जीव चांभाराच्या राजीवर होता. तिच्या-

वर जबरदस्ती करणे, तिची आत्महत्या, त्यातून सुटका करून घेण्यासाठी राजकीय डावपेच, त्यात यश येऊनही मुलाच्या व्यसनाने गलितगात्र झालेला बाप असे कथानकआहे. ते एकाच वेळी व्यक्तिगत व समूहपातळीवर फिरत रहाते.

"लिगाड" मधील दाजीतात्या हा गावातला वतनदार आपल्या श्रीमंतीच्या जोरावर गावात वचक बसवून असतो. रघू हा शिक्षित तरूण आणि त्याच्या उसळत्या रक्ताचा भाऊ शिवा दाजीतात्यांना विरोध करतात. गावाने केलेल्या पाणीपुरवठा योजनेचे पाणी न्याय्य पद्धतीने वाटले जावे ही त्यांची मागणी आहे. वतनदार आणि सामान्य शेतकरी यांच्यातील संघर्ष ही लघुकादंबरी चित्रित करते. दाजीतात्या आणि त्याचे चमचे, मग्रूर बाजी, रघूचा तडफडाट, शिवाचे उसळते रक्त या सा-यातून अकारत जाणारे कथानक ग्रामीण भागातील वास्तव डोळ्यासमोर उभे करते. याबाबत राजन गवस आपले मत व्यक्त करताना म्हणतात की,

"या लेखकाचे गाव म्हणून असणा-या समूहाचे आकलन अधिक नेटके आहे. गावातील गट-तट, गावातील जातीय उतरंड, त्यातील ताण-तणाव, मजूर-मा मालक, नाते संबंध, भ्रष्टाचाराचे स्वरूप, विकासोन्मुख खेडयाची आजची नेमकी अवस्था कोणती या सा-याचे नेमकेपणा हा लेखक टिपतो आणि तितक्याच गांभीर्याने वाचकासमोर ठेवतो." ४

"खाँदेपालट" मधील धोंडीनानांचे दगडासारखे खांदे त्यांचे स्वतःच्या गो-यापान देहावर असलेले प्रेम जाणवते. अचानक बैठकीत त्यांच्या गो-या पायावरचा काळ्या इसबाचा डाग दिसतो. शेवटी नाना रामभाऊंच्या तुकडया खांद्यावर हात ठेवतात. हिरव्यागार बागायतीतून चालताना नानांची पावले

जड झाली. पाय उचले नात, रामभाउचा लुकडा खांदा नांनाना डोंगराएवढा अधाराचा वाटू लागला." असे जीवनातील हार पत्करलेले चित्रण फार बोलके आहे.

मोहन पाटील याच्या "कोंडमारा" आणि "फुलपाखरु" या दोन लघु-कादंब-या आणि "लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन लघुकादंब-या यामध्ये समान आशयसूत्राचा धागा सापडतो. बदलत्या ग्रामीण जीवनातील भेदक चित्रण या चारही कादंब-यात दिसून येते. विविधांगी आशयसूत्र असणा-या या लघू-कादंब-यांचा आवाका मोठा आहे. आटोपशीर कथानकात मोहन पाटील आपला विषय अत्यंत कौशल्याने मांडतात. त्यांच्या चारही कादंब-या बदलत्या खेडयाचा शोध घेणा-या कादंब-या म्हणून महत्वाच्या आहेत.

पाटील यांच्या "कोंडमारा" या लघुकादंबरीत खेडयातील तरुणाची फरफट चित्रित केली आहे. तर "फुलपाखरु" या लघुकादंबरीत प्रेमाचे चित्रण झालेले आहे. याचारही कादंब-यातून समान पार्श्वभूमी झालेली आहे. मोहन पाटील यांच्या कथाशैलीला पोषक अशीच रेखाचित्रे बाळ ठाकूरयानी काढलेली दिसतात. ठाकूरांच्या रेखाचित्राच्या लवचिकपणाविषयी मराठी माणसाला नव्याने काही सांगायची गरज नाही. या रेखाचित्रात स्तब्धता वेग, झुकाव यांचा अर्थान्वय लक्षणीय आहे. मुखपृष्ठावरील जाड "भिवयाखाली भेदक नजर, दोन्ही कादंब-यातील दाजीतात्या आणि धोंडीनाना याना स्थिर चित्राचे रुप आलेले दिसते.

जॅकवेल, पाटाचे पाणी, विहिर, उसाचे शेत ही निर्जीव पात्रेसुध्दा वाचकांशी बोलू लागतात. प्रत्येक मानवी व नैसर्गिक भौगोलिक पात्रांची चित्रणे अत्यंत उठावदार व नेमक्या शैलीत चितारलेली आहेत. मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही लघुकादंब-यात पुढील वैशिष्टये जाणवतात. रुढ मराठी ग्रामीण कादंबरीपेक्षा यांच्या कादंब-यात वेगळी

वैशिष्टये पुढील भागात अभ्यासाच्या सोयीसाठी वर्गीकरण करून पाहिलेली आहे.

## "लिगाड" आणि "खांदेपालट" कादंब-यांची वैशिष्ट्ये :

### १) ग्रामीण जीवन :

"लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही लघुकादंब-यात ग्रामीण जीवन चित्रित झाले आहे. हे चित्रण बदलत्या ग्रामीण जीवनाचे आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण उत्कटतेने आले आहे. लेखक मोहन पाटील हे ग्रामीण भागात जन्माला आलेले आहेत. ग्रामीण भागात जन्माला आलेल्या या लेखकाची अनुभूती अस्सल आहे. त्यातूनच त्यांचे लेखन साकार झालेले दिसते. बदलत्या ग्रामीण जीवनावर परिणाम करणा-या अनेक घटनांचे स्वरूप कादंबरीत मांडलेले दिसते. गावात ग्रामीण विकासाच्या अनेक योजना येतात. पारंपरिक शेती व्यवसायाचे स्वरूप बदलते. धरणे, इरिगेशन, सहकारी सोसायटी यांच्या माध्यमातून शेती उत्पादनाला चालना मिळते. या विकास योजनाबरोबर गावात राजकारण येते. लोकशाही राजवटीत सर्वांना मतदानाचा अधिकार मिळतो. सत्तेत सहभागी होण्याची संधी सर्व स्तरातील लोकाना मिळते.

गावात सहकारातील प्रमुखाकडे सत्तेचे केंद्रिकरण होते. त्यामुळे तो गावचा बलिष्ठही बनला. आपली सत्ता टिकविण्यासाठी तो आरेरावीने वागू लागला. गावातील सामान्य लोकांचे जीवन धोक्यात येऊ लागले. राजकारणातून गावात दुफळी निर्माण होते. जातीजमातीत गटबाजी निर्माण होते. सत्ताप्रमुखांकडून त्यांची विविध प्रकारे पिळवणूक होऊ लागते. दलितांना राजकारणात प्रथमच संधी मिळते. ज्याना संधी मिळाली ते लोक स्वत:चा फायदा करून घेतात. बाकीचा दलित समाज दारिद्र्यातच जीवन जगत असतो. गावातील सत्ताप्रमुख खरेपणाने वागत नाहीत आणि जगण्यातले खोटेपणही त्यांना लपविता येत नाही. त्यामुळे त्यांच्या वागण्याला दुभंगलेपण प्राप्त होते.

शिक्षणाने समाजात पांढरपेशेपण निर्माण केले. परंतु ग्रामीण जीवनात नव्या समस्या निर्माण झाल्या. सत्ताप्रमुखांची मुले संपत्तीचा वापर चैनीसाठी करु लागली. त्यांच्यात व्यसनाधिनता वाढू लागली. अशी मुले व्यसनाविकाराच्या आहारी जाऊ लागली. गावातील सामान्य जनतेला यांचा उपद्रव होऊ लागतो. सामान्य शेतक-यांच्या जीवनात अनेक नव्या समस्या उभ्या राहतात. राजकारणातील शह, प्रतिशह, डावपेच याचा परिणाम शेतकरी जीवनावर होऊ लागला. त्यांच्या पिकाचे पाणी अडविणे, त्यांना अडचणीत आणाने, आपआपसात भांडणे निर्माण करणे यातून त्यांचे शोषण सुरु झाले. त्यामुळे त्यांच्या जीवनात निराशेचे सावट येते.

ग्रामीण जीवनाचे स्वरुप पाहत असताना स्त्रियांचे जीवन वैशिष्ट्यपूर्ण जाणवते. बदलत्या राजकारणातून स्त्रियांच्या जगण्याला वेगळेपण आले. राजकारणाचा खेळ स्त्रियांच्या जीवनाशी खेळला जाऊ लागला. "लिगाड" मधील शकूवरील बलात्कार तिच्या वाघासारख्या भावाचे खच्चीकरण करण्यासाठी होतो. तर "खांदेपालट" मधील राजीचा मृत्यू ग्रामपंचायतीतील पाठिंब्यासाठी झालेला दिसतो. विधवा, परित्यक्ता, दलित, शेतमजूरी करणा-या स्त्रियांचे जीवन शोचनीय असल्याचे जाणवते. ग्रामीण जीवनाची बदलती चित्रे या दोन्ही कादंब-यातून दिसतात.

२) गावातील जातीव्यवस्था :

मोहन पाटील यांच्या दोन्ही लघुकादंब-यातून जातीव्यवस्थेचे चित्रण आले आहे. स्वातंत्र्यानंतर लोकशाही शासन प्रणालीत दलितांना राजकारणात संधी मिळते. "लिगाड" मधील जालिंदर कांबळे व "खांदेपालट" मधील पलाप्पा कांबळे दलित समाजातील पुढारी आहेत. दोघेही ग्रामपंचायतीत डेपुटी सरपंच

असतात. यांचे राजकारणातील स्थान नाममात्र असते. गावातील सत्ता-प्रमुखानी याचा वापर केवळ राजकारणासाठी करून घेतलेला असतो. बदलत्या ग्रामीण वातावरणात ज्यांना राजकारणात संधी मिळाली त्यांनी सत्ता-प्रमुखाच्या पाठिशी राहून आपला फायदा करून घेतला. बाकीच्या दलित समाजाच्या विकासाचा कधी विचार केला नाही. ज्या सत्ताप्रमुखांच्या पाठिशी असतात त्यांच्याविषयीही यांच्या मनात फारसा आदर नसतो.

"लिगाड" मधील दाजीतात्या सारा दलित समाज आपल्या पाठिशी घालतात. आपले राजकीय आसन बळकट करण्यासाठी मराठा जातीत दुफळी निर्माण करतात. भावाभावात कुटुंबात पिढयानपिढयाचे वैर निर्माण होते. जैन समाजाला हाताशी धरतात. गावात जैनाची घरे थोडी असल्यामुळे नानांच्या विरोधात वागत नाहीत. नानांच्या दबावाखाली दलित समाज आणि अल्पसंख्यांक लोक जीवन जगत असतात. "खांदेपालट"मध्ये धोंडीनाना महार आणि चांभार यांच्यात तालमीचा प्रश्न निर्माण करतात. या दोन जातीत कायमचे वैर निर्माण करतात. यातून आपला राजकीय फायदा उठवितात. मराठा आणि जैन यांच्यात फोडाफोडी करतात. सारा दलित समाज आपल्या मूठीत ठेवतात.

बदलत्या ग्रामीण परिसरात लोकांच्या वागण्यात विविध स्तर निर्माण झालेले दिसतात. लेखकाने हे चित्र बारकाईने टिपलेले जाणवते. गावगाडयात बारा बलुतेदारांचे जीवन दुबळे झालेले दिसते. ग्रामीण विकासाच्या योजना या समाजापर्यंत पोहचलेल्या नाहीत हे सतत जाणवते. यामुळे दलित समाज उपेक्षित जीवन जगतआलेला दिसतो.

३) ग्रामीण कुटुंब :

"लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही लघुकादंबऱ्यात ग्रामीण कुटुंबाला उठावदारपणा प्राप्त झालेला दिसतो. ग्रामीण जीवनात कुटुंबाचे

विघटन होत असल्याचे जाणवते. ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण झाले तसे ग्रामीण कुटुंबातही विविध स्तर निर्माण झालेले दिसतात. सामान्य माणसाच्या आणि मजूरांच्या कुटुंबाचे चित्रण वैशिष्ट्यपूर्ण आहे. ग्रामीण विकासाचे वारे यांच्या कुटुंबापर्यंत पोहचलेले दिसत नाही. त्यामुळे कुटुंबातील माणसांना आयुष्यभर काबाडकष्ट केल्याशिवाय जगता येत नाही. सत्ताप्रमुखांच्या दबावाखाली आणि राजकीय खेळीमुळे कुटुंबात अस्थिरता निर्माण झालेली दिसते. कुटुंबाचे अनेक मार्गांनी शोषण चाललेले दिसते. कुटुंबात वडीलमाणसे पारंपरिक जीवनपध्दतीला चिकटून आहेत. तर शिक्षणाने संस्कारित झालेली पुरोगामी विचारांची तरुणपिढी यांच्यात संघर्ष निर्माण झालेला दिसतो.

सामान्य माणसांच्या कुटुंबात केवळ जगणे एवढेच शिल्लक राहिलेले दिसते. राजकीय दबावाखाली कुटुंबाची सतत पिळवणूक होत असल्याचे चित्र दिसते. शेतकरी कुटुंबातील मुलाना शिक्षण मिळाले. परंतु नोकरी मिळाली नाही. शेती करण्याची इच्छा राहिलेली नसते. त्यांचे पुस्तकी ज्ञान जगण्यासाठी उपयोगी पडत नाही. गावातील सत्ताप्रमुखाचा अन्याय निमूटपणे सहन करीत सामान्य कुटुंबातील लोक जीवन जगत असतात.

राजकारणाच्या विरोधातून कुटुंबा-कुटुंबामध्ये पिढ्यानपिढ्याचे वैर निर्माण झालेले दिसते. त्यामुळे कुटुंबे अलिप्तपणे जीवन जगू लागलेली जाणवतात. विकासाच्या अनेक योजना येऊनही शेतकरी कुटुंबात अनेक समस्या निर्माण झालेल्या दिसतात. त्यांना दारिद्र्य आणि निराशाजनक जीवन जगावे लागते. सत्ताप्रमुखांच्या कुटुंबाचे वेगळेपण जाणवते. ट्रॅक्टर, ट्रक, बुलेट ही वाहने त्यांच्या ऐश्वर्याचे प्रतिक आहे. बागायतीतून मिळालेला पैसा खर्च करण्याचे नवे मार्ग शोधू लागल्याचे दिसते. शहरात जाऊन पार्टी करणे, दौलतजादा करणे, दारू पिणे, लग्नसमारंभात अमाप खर्च करणे, या गोष्टी प्रतिष्ठेच्या

वाढू लागल्याचे दिसते. त्यांची मुले अशी वाया गेल्याचे दिसून येते. स्त्रियांना अस्तित्वहीन जीवन जगावे लागत असलेले दिसते. "लिगाड"मधील दाजीतात्यांचा मुलगा मानसिंग व"खांदेपालट"मधील धोंडीनानांचा मुलगा बाळासाब व्यसनाच्या आधिन गेलेले दिसतात.

स्त्रियांना अस्तित्वहीन जीवन जगावे लागत असलेले दिसते. दलित कुटुंबात दु:ख आणि दारिद्र्य दिसते. प्रत्येक कुटुंब आपल्या जातीशी चिकटून असलेले दिसून येते. बदलत्या ग्रामीण परिसरात कुटुंबाचे अनेक स्वरूपात विघटन होताना जाणवते. गावातील राजकारणामुळे समाजात अस्थिरता निर्माण झालेली दिसून येते.

४) शेती व्यवसायाचे बदलते स्वरूप :

"लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही लघुकादंबऱ्यात शेतीव्यवसायाचे बदलते चित्रण आले आहे. स्वातंत्र्यानंतर ग्रामीण विकासाच्या अनेक योजना खेड्यात आल्या. नदीवर धरणे बांधली. कालवे काढले. पाटाचे पाणी शेतीला मिळू लागले. त्याचा परिणाम बागायती वाढली. ऊसाचे पिक शेतकरी घेऊ लागले. फळांच्या बागा उभ्या राहिल्या. ग्रामीण भागात साखर कारखाना उभा राहिला. शेती करण्याची जूनी पारंपरिक पध्दती मागे पडली. शेतकरी सुधारीत शेती करु लागला. ट्रॅक्टरने शेतीची मशागत करु लागला. आधुनिक बियाने व रासायनिक खताचा वापर करु लागला. पिकपाण्याची माहिती तो वाचू लागला. कृषितज्ञाचा सल्ला घेऊन तो आपल्या शेतीत तो नवे प्रयोग करु लागला. याचा परिणाम शेतीचे उत्पादन वाढलेले दिसून येते. शेतकऱ्यांना पैसा मिळू लागला.

शेती उत्पादनात वाढ झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागला. त्यांच्या जीवनातील दारिद्र्य कर्जबाजारीपणा कमी होऊ लागला. शेतात सतत ऊसाचे पिक घेतल्यामुळे, रासायनिक खतांचा जास्त वापर यामुळे

शेतक-यांच्या जमिनी निकृष्ठ झाल्या. असे बदलते शेतीचे चित्रण दोन्ही कादंब-यात आलेले आहे.

## ग्रामीण समूहजीवन :

या दोन्ही कादंब-यात आलेल्या समूहभावना महत्त्वाच्या आहेत. प्राचीन स्वयंपूर्ण खेड्याचे चित्र कुठेही आढळत नाही. बदलत्या गावगाड्यात विविध स्तर निर्माण झालेले दिसतात. जीवनातील नव्या समस्यातून ते स्तर निर्माण झालेले जाणवतात. याचा परिणाम गावात दुफळी निर्माण झालेली दिसते. प्रत्येक जातीत, भावकीत, कुटुंबात, भावाभावात वैरत्वाची भावना निर्माण झालेली दिसते. प्रत्येक कुटुंब आपले वेगळे अस्तित्व जाणवून देत असल्याची जाणीव होते.

ग्रामीण समूहाच्या भावना दु:खाच्या निराशेच्या असल्याचे दिसते. ग्रामीण जीवनात परिवर्तन करणा-या अनेक योजना खेडयात आल्या. परंतु सामान्य लोकांच्या जीवनात उदासिनता व निराशा वाढत चाललेली दिसते. जगण्यावरची त्यांची श्रध्दा ढळत चाललेली जाणवते. सत्ताप्रमुखांच्या दबावाखाली समूहमन सतत चिरडले गेलेले दिसते. या दबावाच्या परिणामामुळे त्यांच्या भावना दडपल्या गेलेल्या दिसतात. लोकांच्या भावनांचा सतत कोंडमारा होत असलेला जाणवतो. सत्ताप्रमुखाचा अन्याय विविध मार्गाने होत असलेले शोषण त्यांचे मानसिक, शारीरिक, आर्थिक खच्चीकरण यामुळे समूहमनाचे जीवन दुबळे झालेले दिसते. गावातील सत्ताप्रमुखाचे वागणे सर्वांना समजते. परंतु त्याला विरोध करण्याची शक्ती दुबळी झालेली दिसते.

शिक्षण घेतलेले तरूण चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करतात. परंतु घरातील आईवडील त्यांना विरोध करतात. गावातील अन्याय निपटून काढ-ण्याची इच्छा असणा-या तरूणांचे खच्चीकरण होते. गावठी राजकारणातील

डावपेच त्यांना समजत नाहीत. त्यांची निराशा होते. जीवनातील उमेद, उत्साह संपलेला जाणवतो. गावातील लोकांच्या भावनांचा सतत कोंडमारा होत असलेला जाणवतो. समूहमनाचे हे दु:ख पाटलांच्या कादंब-यात ठळकपणे जाणवते.

६) <u>राजकारण :</u>

ग्रामीण भागातील बदलत्या राजकारणाचे चित्रण येथे आलेले आहे. ग्रामीण भागात पाटील हा परंपरागत सत्ताप्रमुख होता. गावातील सर्व अधिकार पाटलांकडे होते. स्वातंत्र्यानंतर खेड्यात पंचायती राज्य आले. खेड्यात ग्रामपंचायती स्थापन झाल्या. निवडणूक प्रक्रियेमुळे गावातील सर्व स्तरातील लोकाना मतदानाचा अधिकार मिळाला. सत्तेत सहभागी होण्याची संधी सर्वांना मिळाली. राजकारणाबरोबर ग्रामीण विकासाच्या विविध योजना खेड्यात आल्या. सहकाराचे जाळे विणले. सहकाराच्या माध्यमातून गावच्या विकासप्रक्रियेला चालना मिळाली. त्यामुळे गावातील पाटलांचे महत्व कमी झाले. गावची सत्ता सहकारातील प्रमुखांकडे आली. गावात जो धूर्त होता, ज्याच्याजवळ बेरकीपणा होता, डावपेच होते अशा लोकानी राजकारणातील विरोध मोडून काढला. गावची सत्ता आपल्या हातात घेतली. सत्ता, संपत्ती, शक्ती यांच्या जोरावर त्यांनी आपले आसन बळकट केले गावच्या सत्तेचे केंद्रस्थान बदलल्यामुळे गावचे बलस्थानही बदलले.

गावचा सत्ताप्रमुख आपले राजकीय आसन स्थिर करण्यासाठी ग्रामीण जीवनावर दबाव निर्माण करु लागला. "लिगाड" मधील दाजीतात्या आपले राजकीय आसन टिकविण्यासाठी अनेक भानगडी करतात. गावात दुफळी निर्माण करतात. दाजीतात्यांना विरोध करणा-या लोकांची सतत तो अडवणूक करु लागला. प्रसंगी सत्ताप्रमुखाला विरोध करणारा जमीनदोस्त झालेला दिसू लागला. दाजीतात्यांचे असे वागणे केवळ सत्ता टिकविण्यासाठी चाललेले असते.

दाजीतात्या जातीजातीत संघर्ष निर्माण करून आपला फायदा उठवितात. सहकाराच्या सर्व नाडया आपल्या हातात ठेऊन लोकांची पिळवणूक करतात असे चित्र दिसते.

गावातील तरूण दाजीतात्यांना विरोध करतात. परंतु त्यांना आडचणीत आणून त्यांचे मानसिक खच्चीकरण करतात. बजरंगसारखा तरूण तात्यांना विरोध करतो. तात्या त्याची बहिण शकूवर बलात्कार करून त्या कुटुंबाची वाताहत करतात.

"खांदेपालट" मध्ये ग्रामीण व्यवस्थापणाचे चित्रण आले आहे. ग्राम-पंचायतीतील रोटेशन पध्दतीला उठावदारपणा आलेला आहे. सरपंचपद आपल्याकडे राहावे म्हणून धोंडीनाना पंचायत सदस्यामध्ये फोडाफोडी करतात. ग्रामपंचायतीचे बहूमत आपल्या बाजूने घेतात. नानाला विरोध करणारा फक्त तुकाराम पाटील असतो. त्याच्या बाजूच्या सदस्यात फोडाफोडी करून नाना त्यांचे राजकीय कंबरडे मोडून टाकतात. लकुळ्या चांभाराची शिट आपल्या बाजूने होण्यासाठी त्याच्या भावाची मुलगी राजीवर बलात्कार करतात. तिला विहिरीत टाकतात. राजीच्या मृत्यूनंतर लकुळ्याला भिती घालतात.

दलित समाजाला राजकारणात सहभागी होण्याची संधी मिळालेली असते. "लिगाड" मधील जाजिंदर कांबळे व "खांदेपालट" मधील यलाप्पा कांबळे ग्राम-पंचायतीत डेपुटी सरपंच असतात. परंतु राजकारणातील यांचे स्थान नाममात्र असते. गावातील सत्ताप्रमुख यांचा वापर केवळ राजकीय पाठिंब्यासाठी करून घेतात. ज्या दलितांना राजकारणात संधी मिळते. त्यांनी सत्ताप्रमुखांच्या पाठिशी राहून स्वत:चा फायदा करून घेतला. बाकीच्या दलितांना मतदाना-शिवाय राजकारणात काही महत्व राहिलेले दिसत नाही.

ग्रामीण भागात राजकारण घराघरात शिरलेले दिसते. त्यामुळे डावपेच,

शह, प्रतिशह, बदला असे प्रकार सुरू झालेले दिसतात. याचा परिणाम गावातील लोकात पिढयानपिढयाचे वैर निर्माण झालेले दिसून येते. अशा बदलत्या राजकारणातील बारकावे लोकांनी मोठया कौशल्याने टिपलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्याना वैशिष्ट्यपूर्णता लाभलेली दिसत आहे.

७) ग्रामीण सुशिक्षित :

स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा प्रसार खेडयात वेगाने झाला. शाळा महाविद्यालये यांची स्थापना खेडयात झाली. त्यामुळे शेतकऱ्यांची मुले कमी-अधिक प्रमाणात शिक्षण घेऊ लागली. शिक्षण घेतलेली तरूण मुले नोकरी-साठी शहराकडे धाव घेऊ लागली. शिक्षणाने त्यांच्यात पांढरपेशेपण आले. त्यामुळे कुटुंबाचा पारंपरिक शेतीव्यवसाय करावा हे त्यांना कमीपणाचे वाटू लागले. करमणुकीची अनेक साधने खेडयात पोहचली. त्यामुळे ग्रामीण जीवनावर शहरी संस्कृतीची छाप पडू लागली. ग्रामीण जीवनातील श्रमाचे महत्व कमी होऊ लागले. खेडयातील बागायतदारांच्या मुलांनी आपले शिक्षण अर्ध्यावर सोडून दिले. नव्याने हाती आलेल्या भरपूर पैशामुळे त्यांना शिक्षणाचे महत्व वाटले नाही. अशी मुले बापाने मिळविलेल्या संपत्तीचा विनियोग चैनीसाठी करु लागली. शहरात जाणे, गाडीवर फिरणे, वासनेची भूक भागविण्यासाठी वेशावस्तीत जाणे, दारु पिणे अशा सवयी त्यांना जडतात. आपल्या मुलावर चांगले संस्कार करण्यासाठी सत्ताप्रमुखांना वेळच मिळत नसल्याचे जाणवते.

सामान्य कुटुंबातील सुशिक्षित नोकरी मिळाली नाही म्हणून निराश दिसतो. आदर्श नितीमूल्यावरील त्यांची श्रध्दा ढळत जाते. गावातील अन्याय-कारक वागणे त्यांना पसंत पडत नाही. म्हणून गावातील सत्ताप्रमुखाला विरोध करण्याचा प्रयत्न करतात. गावातील लोकांचा त्यांना पाठिंबा मिळत नाही. न्याय्य पध्दतीने सर्वांना जगता आले पाहिजे असा विचार तरूणांच्या मनात येतो. सुशिक्षित तरूणांचे हे विकसित विचार समाजात रूजत नाहीत. त्यांच्या

मनाचा सतत कोंडमारा होतो. त्यांच्या भावनेची सतत घुसमट होते. त्यामुळे ग्रामीण सुशिक्षितांमध्ये उदासिनता, नैराश्य यांचे सावट आलेले दिसू लागते. पुस्तकी ज्ञानापेक्षा प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असल्याची जाणीव ज्या तरुणांना होते.

८) दुभंगलेपण :

गावातील सत्ताप्रमुख आपले राजकीय आसन स्थिर करण्यासाठी अनेक डावपेच लढवितात. "लिगाड" मधील दाजीतात्या व "खांदेपालट"मधील धोंडीनाना यांच्या जगण्याला दुभंगलेपण प्राप्त झालेले दिसते. ही सत्ताप्रमुख माणसे आपली सत्ता टिकविण्यासाठी गावात अनेक भानगडी करतात. विविध प्रकारचे डावपेच लढवितात. सा-या गावाचे जीवन अस्थिर करुन सोडतात. सत्तेसाठी ते खरेपणाने वागत नाहीत. आणि त्यांच्या जगण्यातला खोटेपणाही त्यांना लपविता येत नाही. त्यांचे खलप्रवृत्तीचे वागणे त्यांच्या दुभंगलेपणाला कारण ठरते.

"खांदेपालट" मधील धोंडीनाना सरपंचपद आपल्याकडे राहावे म्हणून वेगळी राजकीय खेळी खेळतात. गावात दुफळी निर्माण करतात. महार, चांभार जातीत संघर्ष निर्माण करतात. मराठा-जैन यांच्यात भांडण निर्माण करतात. नानाकडे धूर्तपणा आहे. त्यांच्यातील धूर्तपणा त्यांच्या मुळामध्ये नसतो. त्यामुळे त्यांना ख-या अर्थाने सत्तेची खांदेपालट करता येत नाही. त्यांचे जीवन अस्थिर होते. आपल्या जगण्यातला खोटेपणा सतत लपविण्याचा प्रयत्न ते करतात. त्यांना खरेपणाने जगता येत नाही. त्यामध्ये त्यांच्या व्यक्तिमत्वाचे दुभंगलेपण जाणवते.

दाजीतात्याव धोंडीनाना यांचे वागणे धूर्तपणाचे असते. त्यांच्याजवळ बेरकीपणा आहे. जगण्यातली मग्रूरी आहे. त्यामुळे ते खलप्रवृत्तीने वागतात. केवळ सत्तेसाठी त्यांचे वागणे बदलत जाते. त्यांचे खलप्रवृत्तीचे वागणेच त्यांच्या

दुभंगलेपणाला कारणीभूत होते. आजपर्यंत टिकवून ठेवलेली सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा आपल्या हातून जाणार या भविष्य काळाची जाणीव त्यांना होते. त्यामुळे त्यांचे जीवन अधिक अस्थिर होत जाते. दाजीतात्या आणि धोंडीनाना दोन्ही कादंबरीचे नायक आहेत. ग्रामीण विकासाला चालना देण्याचे कार्य दोघेही करतात. स्वत:च्या स्वार्थ साधत असताना गावात काही विधायक कार्य करतात. त्यांच्याकडे काही चांगले गुणही आहेत. परंतु त्यांचे स्त्रीलंपट वागणे, बेमूर्वतपणा यातून त्यांना दुभंगलेपण प्राप्त झालेले जाणवते.

९) स्त्री जीवन :

या दोन्ही कादंब-यातून आलेले स्त्रीजीवन वैशिष्ठ्यपूर्ण आहे. रूढ मराठी कादंबरीतील स्त्रीजीवनातील समस्यापेक्षा पाटील यांच्या कादंब-यातील स्त्रीजीवनात नव्या समस्या उभ्या राहिलेल्या जाणवतात. बदलत्या ग्रामीण जीवनात स्त्रिया शिक्षणापासून दूर राहिलेल्या दिसतात. गावच्या राजकारणातही त्यांना संधी मिळाली नाही. त्यांच्या दोन्ही कादंब-यात आलेले स्त्रीजीवन वैशिष्टयपूर्ण आहे. "लिगाड"मधील विधवा जीवन जगणारी बजरंगाची आई हलाकीचे जीवन जगते. तरुण विधवा शकू प्रेम करण्याचा गुन्हा करते. आपल्या उद्‌ध्वस्त झालेल्या संसाराला पुन्हा उभा करण्याचा प्रयत्न करते. परंतु ती सत्ताप्रमुखाच्या वासनेची शिकार होते. गावातील राजकारणातील डावपेच शकूचे जीवन धुळीला मिळवतात. सामान्य शेतकरी कुटुंबातील स्त्रिया कष्टमय शोषित जीवन जगतात.

बदलत्या गावगाडयात लगम्याच्या बायकोसारख्या छीनाल स्त्रियापण असल्याचे जाणवते. अशा स्त्रिया धड कोणाजवळही टिकून राहत नाहीत. त्यामुळे आयुष्यभर त्यांची कुतरओढ होत असल्याचे जाणवते. "खांदेपालट"मधील राजी धोंडीनानांच्या वासनेला आणि राजकारणाला बळी पडते. तर तरुण

मजूर स्त्रियांच्या असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण होते. बागायतदारांची मुले त्यांच्याकडे वासनेच्या नजरेतून पाहू लागतात. दलित समाजातील चंदाला दररोज गवताचा भारा विकल्याशिवाय पोट्टाला मिळत नाही. चंदाचे हे दारिद्र्य सा-या दलित समाजाचे चित्र उभे करते. दलित मजूर स्त्रियांना आयुष्य-भर दुःख आणि दारिद्र्याशी झुंज यावी लागत असल्याचे जाणवते. ग्रामीण परिसरातील विकासाचा फायदा अशा स्त्रियांना झाला नाही असे जाणवते.

धोंडीनानाची बायको भागिरथीला ऐश्वर्यसंपन्नता असूनही महत्व नाही. नानांच्या राजकीय मोठेपणात तिला स्थान नाही. उंब-याच्या आत घरातच तिला अस्तित्वहीन जीणे जगावे लागते. घरातच तिचा सतत कोंडमारा होत राहतो. आपला मुलगा वाया जात आहे, तो व्यसनाधिन झाला आहे, हे नानाला सांगण्याचे धाडस तिला होत नाही. बदलत्या ग्रामीण जीवनात स्त्रियांच्या जगण्यापुढे नव्या समस्या उभ्या राहिलेल्या दिसतात. शिक्षण आणि राजकारणापासून या स्त्रिया दूर राहिलेल्या जाणवतात. त्यामुळे अज्ञान, अंधश्रद्धा त्यांच्या जीवनाला ग्रासून राहिलेली चित्र ग्रामीण भागात दिसते. ग्रामीण बदलाचा परिणाम स्त्रियांच्या जीवनावर फारसा झालेला जाणवत नाही. पिढयान पिढयाचे दुःख त्यांना भोगावे लागत असलेले दिसते.

जीवनदृष्टीचे वेगळेपण :

कादंबरीकार कादंबरीत आपला जीवनविषयक दृष्टिकोण मांडत असतो. लेखकाचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण त्यातून साकार झालेला दिसतो. "लिगाड" आणि "खांदेपालट" या लघुकादंब-यात बदलते ग्रामीण जीवन साकार झालेले आहे. या बदलत्या ग्रामीण जीवनाकडे लेखक संवेदनशील भावनेने पाह-तात. ग्रामीण मनाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या कादंब-यातून दिसून येते. ग्रामीण जीवनातील बारकावे टिपण्याचे त्यांचे कसब वैशिष्टयपूर्ण आहे.

बदलत्या ग्रामीण जीवनात पुन्हा नव्याने सरंजामशाहीवृत्ती मूळ धरत असलेली जाणवते. या प्रवृत्तीमुळे सामान्य माणसांचे शोषण वेगळ्या स्वरूपात होत असल्याचे चित्र दिसते. सामान्य माणसांच्या या पिळवणूकीतून निर्माण झालेले संघर्ष वास्तवाच्या पातळीवर गेलेले जाणवतात. ग्रामीण संस्कृतीत नवा बदल होत असताना मानवी जीवनातील विविध स्तरातील बदल वैशिष्टयपूर्ण आहे. सरंजामशाहीवृत्तीने वागणाऱ्या सत्ताप्रमुखांच्या दुटप्पी वागण्यामुळे ग्रामीण जीवन अस्थिर होते. गावातील एकसंघ स्वरूप नाहीसे होते. गावात दुफळी निर्माण होते. विविध प्रकारची सत्ता हातात असूनही, संपत्ती, प्रतिष्ठा असूनही अशी माणसे जीवनात समाधानी असलेली दिसत नाहीत. त्यांच्या खलप्रवृत्ती वागण्यामुळे त्यांच्या जगण्याला दुभंगलेपण आलेले आहे. माणसांच्या दुभंगलेपणाला या कादंबऱ्यात उठावदारपणा आलेला दिसतो. श्रीमंतीचे जीणे जगणाऱ्या यांच्या बायकांचा मात्र कोंडमारा होताना दिसतो. त्यांना अस्तित्वहीन जगावे लागते. नवऱ्याच्या सत्तेत, प्रतिष्ठेत बायकोला काहीसुध्दा महत्व नसलेले जाणवते.

ग्रामीण जीवनाकडे पाहत असताना पाटील केवळ बदलत्या ग्रामीण परिसराचे वर्णन करून थांबत नाहीत तर या जीवनात नव्याने उभे राहिलेले संघर्ष, त्यांच्या मनाची होत असलेली घुसमट, त्यांच्या भावनेचा होत असलेला कोंडमारा यांचे चित्रण बारकाईने केलेले दिसून येते. मानवी जीवनातील विदारक सत्य त्यांनी मांडलेले दिसते. सामान्य शेतकरी जीवनाकडे लेखक सहानुभूतीने पाहताना दिसतात. त्यांच्या जीवनातील नव्या समस्या महत्वाच्या वाटतात. ग्रामीण जीवनात समृध्दी येऊनही शेतकऱ्यांचा कोंडमारा होत असलेला दिसतो. शेतीला वेळेवर पाणी मिळत नाही. सतत त्यांची अडवणूक होते. शेतीचे उत्पादन वाढून ही शेतकऱ्यांच्या हातात पैसा पडत नाही. कर्जापोटी उसाचे बिल कापून घेतले जाते. अशा विविध स्वरूपात शेतकऱ्यांची कुचंबना होताना दिसते.

ज्यांच्या हातात पैसा खेळू लागला त्यांनी पैसा खर्च करण्याचे नवे मार्ग शोधून काढले. हॉटेलात जाणे, दारू पिणे, जेवनावळी घालणे, लग्नसमारंभात आपल्या श्रीमंतीचे प्रदर्शन भरविणे असे वागणे बदलत गेलेले दिसते. यामुळे बागायतदारांची मुले वाया जाउ लागली. ग्रामीण जीवनाकडे विविध स्तरातील लोकाकडे वेगळया भावनेने लेखक पाहत असलेले जाणवते. ग्रामीण सुशिक्षितांची अडवणूक, त्यांच्या मनाची घुसमट, त्यांच्यातील पांढरपेशेपण यांचे चित्रण बारकाईने टिपलेले दिसते. तर सामान्य जनता सत्ताप्रमुखांच्या दबावाखाली जीवन जगत असल्याचे दिसून येते.

स्त्री जीवनाकडे पाहत असताना यांच्या जीवनात नवी संकटे उभी राहिलेली दिसतात. अजूनही स्त्रीकडे वासनेच्या भावनेने पाहिले जात असल्याचे जाणवते. स्त्री-पुरुष समानतेचा विचार बदलत्या जीवनात रुजलेला जाणवत नाही.

११) समग्र आकलन :

मोहन पाटील यांच्या कादंब-यांची वैशिष्ट्ये पाहत असताना त्यांचे ग्रामीण जीवनाचे समग्र आकलन जाणवत राहते. कोल्हापूर जिल्हयातील पूर्वेला पंचगंगा नदीच्या काठी असणा-या शिरदवाड या गावी त्यांचा जन्म झाला. ग्रामीण जीवनातील बदल त्यांनी प्रत्यक्ष अनुभवला आहे. ज्या परिसरात ते वावरले तो परिसर त्यांनी प्रत्यक्ष चित्रित केला आहे. ग्रामीण परिसरातील अनेक घटना, प्रसंग यांचे बारकाईने निरिक्षण केलेले आहे. बदलत्या ग्रामीण वातावरणाने लेखकाचा पिंड घडविलेला आहे. कमी अधिक प्रमाणात ग्रामीण समस्याना त्यांना प्रत्यक्ष तोंड द्यावे लागले आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनातील समस्या ते वास्तवतेने मांडत असताना दिसतात. बदलत्या ग्रामीण जीवनात जे पाहिले जे प्रत्यक्ष अनुभवले ते त्यांनी आपल्या कादंब-यातून मांडलेले

दिसते. ग्रामीण जीवनातील चढउतार गरिबी, श्रीमंती, राग, लोभ, हेवेदावे प्रत्यक्ष अनुभवल्यामुळे त्यांच्या कादंब-यातील व्यक्तिचित्रणाला उठावदारपणा आलेला जाणवतो.

पाटील केवळ ग्रामीण जीवनाचे, परिसराचे वर्णन करून थांबत नाहीत, तर ग्रामीण जीवनातील ताण-तणावे, हेवेदावे, राग-लोभ, संघर्ष डावपेच, दुःख दारिद्र्य, वासना, दुबळेपणा मग्रूरी, व्यसनाधिनता, यातून ग्रामीण जीवन कसे अस्थिर होत चाललेले आहे याचे दर्शन घडवितात. ग्रामीण समूहमनाचे त्यांचे आकलन ठळकपणे जाणवते. ग्रामीण जीवनातील मौलिकता व सत्य प्रकट होताना दिसते. ग्रामीण जीवनातील विविध स्तरातून निर्माण झालेले भावनिक संघर्ष अत्यंत कौशल्यपूर्णतेने टिपलेले दिसतात.

ग्रामीण जीवनाची समग्र जाणीव असल्यामुळेच जीवनातील वास्तव प्रकट करण्याचे कसब लेखकाला साधता आलेले दिसते. बदलत्या ग्रामीण जीवनाशी समरस होऊन बदलांचे सर्वांगीण चित्रण त्यांनी केलेले आहे. म्हणून समग्र आकलन असलेला लेखक म्हणून त्यांचे वैशिष्टये महत्त्वाचे आहे.

ग्रामीण माणूस व वातावरण यांचे आकलन लेखकाच्या ठायी आहे. ग्रामीण वातावरणात साकार झालेल्या ग्रामीण जीवनाची सखोलता पाटील यांच्याकडे आहे. त्यांच्या लेखनात वास्तव आहे. करुणाखरपणा आहे. गांभीर्य आहे. लेखकाचे ग्रामीण जीवनातील अस्सल अनुभव आणि शोधक दृष्टी यामुळे हे अनुभव आणि चित्रण जिवंत आणि वास्तव ठरलेले आहे. या दोन्ही लघु-कादंब-यातून ग्रामीण जीवनाचे भेदक चित्रण केलेले आहे.

मराठी ग्रामीण साहित्यात कालपरवापर्यंत एक प्रकारचा भाबडेपणा डोकाऊन जात असलेला दिसतो. प्रत्यक्षात माणसात चित्रविचित्रपणा, कडवेपणा आणि वरून दिसणा-या स्वभावाच्या आतला एक परिस्थितीवश

हताशपणा, हे सारे गेल्या दशकातल्या काही मोजक्या लेखकांच्या लेखणीतील क्सब मोहन पाटलांच्या कादंब-यातही दिसते. ग्रामीण इरसालपणा येथे विनोदाच्या अंगाने येत नाहीत तर ग्रामीण जीवनातील अनिर्बंध सत्ता-संपत्तीमुळे निर्माण झालेल्या मग्रुरीतून येताना दिसतो. या बदलत्या ग्रामीण जीवनाशी समरस झालेल्या लेखकाना या जीवनाचे समग्र आकलन असल्याचे जाणवत राहते.

भाषाशैली :

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खोदेपालट" या दोन्ही लघु-कादंब-यात भाषाशैलीची महत्वाची वैशिष्ठये दिसून येतात. भाषाशैलीच्या वैशिष्टयपूर्णतेमुळे कादंबरीच्या कथानकाला उठावदारपणा आलेला आहे. पाटील यांच्या कादंब-यांचा अभ्यास करताना भाषाशैलीची काही वैशिष्ठये खालील-प्रमाणे जाणवतात.

निवेदन शैली :

या दोन्ही लघुकादंब-यातील निवेदन तृतीयपुरुषी आहे. "लिगाड" मधील कथानक रघूच्या तोंडी आहे. रघू हा "लिगाड" कादंबरीचा निवेदक आहे. रघूच्या तोंडी नागरभाषा आहे. परंतु या कादंबरीत ज्या अशिक्षित व्यक्ति-रेखा आल्या आहेत त्यांच्या तोंडी ग्रामीण भाषेचा वापर दिसून येतो. उदा. शिवा, बजरंग, बापू यांच्या बोलण्याची भाषा ग्रामीण बोली आहे.

"खांदेपालट"मध्ये धोंडीनाना कादंबरीचा निवेदक आहेत. त्यांच्या तोंडी ग्रामीण भाषा आहे. कादंबरीत जिथे संवाद आलेले आहेत, त्या ठिकाणी ग्रामीण बोलीभाषेचा वापर केलेला आढळतो. या ग्रामीण बोलीभाषेमुळे त्या संवादाला जिवंतपणा प्राप्त झालेला दिसतो.

## ग्रामीण बोलीतील म्हणी, वाक्प्रचारांचा वापर :

या दोन्ही लघुकादंब-यात ग्रामीण बोलीतील अनेक म्हणींचा आणि वाक्यप्रचारांचा वापर केलेला आढळतो. यांच्या वापरामुळे व्यक्तींच्या जीवनावर अधिक प्रकाश पडलेला दिसतो. त्यातील काही म्हणी व वाक्यप्रचार उदाहरणादाखल देत आहे.

१) त्येंच ते हाळ हिरित पडू दे .।
२) आव, वेसबा बायागत हे राजकारण पैशाला पासरी.
३) आयला हैच्या.। ह्या गावात काय घडल नी काय न्हाई, वांग्याच भूत करतील तर कवा अवचितराव उठून शाणपण शिकवल."
४) लोकानी केळ सोलून तुमच्या तोंडाम्होर धरल तरी खा म्हटल्याबिगार खाणार नाही.
५) आमच्या मराठया माणसाची गत डालग्यातल्या खेकडयागत हाय.।
६) यलाप्पा, कांदाभजी गरम तोंडात घातल्यावर काय होत माहित हाय. तोंडाला चटका बसतो. म्हणून ती अगोदर फोडून वाफारा जाऊ देऊन खावी असतात.

अशा अनेक ग्रामीण जीवनातील म्हणी व वाक्यप्रचारांचा वापर केलेला आढळतो. अशा ग्रामीण बोलीमुळे कादंबरीतील कथानकाला वास्तवता प्राप्त झालेली आहे.

## लयबद्दता :

या दोन्ही लघुकादंब-यातील कथानकाला एक प्रकारची लयबध्दता प्राप्त झालेली दिसते. पाटील यानी काही वाहनांचा आवाज बारकाईने टिपलेले आहेत.

ट्रॅक्टरचा आवाज - रॉव.. रॉव.. फट्टा.. फट्टा..
बुलेटचा आवाज - फट्टा... फट्टा.. बुद.. बुद..

अशा प्रकारच्या आवाजाने एक प्रकारची लयबद्दता निर्माण झालेली दिसते. पाटील यांच्या कादंब-यातील निवेदनशैली ग्रामीण बोली आणि प्रमाण भाषेचे मिश्रण, बोली भाषेची लकब या वैशिष्टयामुळे भावाशैलीचे वेगळेपण जाणवते.

१३) समारोप :

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही लघु-कादंब-यात आपणाला एक समान आशयसूत्र सापडते. बदलते ग्रामीण जीवन दोन्ही कादंब-यात आलेले आहे. बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण करीत असताना लेखक केवळ ग्रामीण जीवनाचे बाहय वर्णन करीत नाहीत. तर ग्रामीण जीवनाच्या अंत:करणाला स्पर्श करण्याचे सामर्थ्य त्यांच्या लिखाणात दिसते. बदलते ग्रामीण जीवन विविध स्वरूपात कसे बदलत गेले हे अत्यंत बारकाईने टिपलेले आहे. हे जीवन बदलत असताना नव्याने कोणत्या समस्या उभ्या राहिलेल्या आहेत, त्या समस्या सोडविण्यासाठी माणसांची चाललेली धडपड दिसून येते. माणसांच्या जीवनातील गुंतागुंत त्यांच्या जीवनातील संघर्ष, ताण-तणावे यामुळे झालेले दुबळे जीवन ही महत्त्वाची वैशिष्ठ्ये या कादंब-यात दिसतात.

बदलत्या ग्रामीण जीवनातील विविध प्रकारच्या समस्यांमुळे ग्रामीण जीवनात विविध स्तर निर्माण होतात. यामुळे संपूर्ण ग्रामीण जीवनच दुभंगलेले दिसते. सत्तेसाठी धडपडणारी माणसे जगण्यासाठी धडपडणारी, पिकासाठी धडपडणारी, वासनातृप्तीसाठी धडपडणारी अशा विविध स्वरूपातील माण-सांचे चित्रण या कादंब-यातून दिसून येते.

या कादंब-यात आलेले बदलते शेतीचे स्वरूप महत्त्वाचे आहे. शेती उत्पादनाला चालना देणा-या अनेक योजना खेडयात येतात. त्यामुळे पारंपरिक शेती करण्याची पध्दत कालबाहय होते. आधुनिक पध्दतीच्या शेतीव्यवसायामुळे

शेतक-यांच्यात दोन स्तर निर्माण झाले. एक बांधावरची शेती करणारा बडया बागायतदारांचा वर्ग, दुसरा स्वत: कष्ट करणारा सामान्य शेतक-यांचा वर्ग. बडया बागायतदारानी सहकाराचे सर्व फायदे आपणाच घेतले. त्यामुळे सामान्य शेतक-यांची कुचंबना होऊ लागली. तो सतत अडचणीत येऊ लागला. शेतीव्यवसायातही गावचे राजकारण शिरले. जो आपल्या बाजूने नाही त्या शेतक-याची अनेक प्रकाराने पिळवणूक होऊ लागली. शेती व्यवसायावरील त्यांची श्रध्दा ढळत चालली. त्यामुळे सामान्य शेतक-यांच्या जीवनात नैराश्य आलेले जाणवते. बडे बागायतदार आपले राजकीय आसन स्थिर करण्यासाठी गटा-तटाचे राजकारण खेळू लागले. त्याचा परिणाम गावात दुफळी निर्माण होते. पिढयानपिढयाचे वैरत्व निर्माण होते;गावाचे म्हणून जे समूहमन असते त्याचे अस्तित्व राहत नाही. बडया बागायतदारांच्या दुटप्पी वागण्यामुळे त्यांच्या जगण्याला दुभंगलेपण प्राप्त होते.

शिक्षणाने ग्रामीण जीवनात पांढरपेशेपण निर्माण केले. परंतु नोकरीच्या शोधात असणारा ग्रामीण तरुण दिशाहीन अवस्थेत भरकटू लागला. त्याला नोकरी नाही. शिवाय पारंपरिक शेतीव्यवसाय करणे त्याला कमी-पणाचे वाटू लागले. शेती उत्पादन वाढल्यामुळे बडया बागायतदाराकडे पैसा खेळू लागला. त्यांची मुले मग्रुरीचे जीवन जगू लागली. व्यसनाधिन होऊ लागली. विलासी जीवन जगण्याकडे त्यांचा कल वाढू लागला. शिक्षण घेऊनही नोकरी मिळाली नाही त्यामुळे त्यांच्या जीवनात निराशा आलेली जाणवते.

नागर संस्कृतीचे अनेक संस्कार खेड्यावर झाले. खेडयात फॅशन आली. बोलीभाषेत इंग्रजी शब्दाचा वापर होऊ लागला. शाळा महाविद्यालये आली. परंतु ग्रामीण जीवन नव्या संकटाला सामोरे जात असलेले दिसते. ग्रामीण विका-साच्या प्रत्येक योजनामुळे नवे संकट निर्माण झालेले जाणवू लागले. त्याचा परिणाम ग्रामीण समूहमन अस्तित्वात राहिले नाही.

लोकशाही राजकारणात दलितांना सत्तेत सहभागी होता आले. लोकशाही प्रक्रियेमुळे त्यांना राजकीय समानता प्राप्त झाली. परंतु आर्थिक आणि सामाजिक समानता त्यांना मिळाली नाही. सत्ताप्रमुख त्यांचा वापर केवळ राजकीय पाठिंब्यासाठी करून घेऊ लागला. ज्या दलितांना राजकारणात पुढारीपण मिळाले त्यांनी स्वत:चा फायदा करून घेतल्याचे चित्र दिसू लागले. बाकीच्या दलित समाजाच्या जीवनात विशेष बदल झालेला दिसून येत नाही. दु:ख, दारिद्र्य, अवमान, लाचारी हे सामान्य माणसांच्या जगण्याचे चित्र दिसू लागले. या बदलत्या स्वरूपाचे चित्र मोहन पाटील यानी बारकाईने टिपलेले दिसून येते.

या दोन्ही लघुकादंब-यात मोहन पाटील यानी ग्रामीण बोली भाषा व प्रमाणभाषा यांचा वापर केलेला आहे. ग्रामीण बोली भाषेचे अनेक विशेष जाणवतात. बोली भाषेतील म्हणींचा वापर स-र्हास केलेला दिसतो. यामुळे कादंबरीच्या कथानकाला जिवंतपणा प्राप्त झालेला आहे. एखादी घटना किंवा प्रसंग उभा करीत असताना लेखक सिनेमातील चित्राप्रमाणे सीन उभा करतात. त्या प्रसंगातील बोलीभाषेमुळे तो प्रसंग वाचकाच्या मनावर बिंबवला जातो. तो प्रसंग जिवंत स्वरूपात साकार होत असलेला जाणवतो. प्रमाण भाषेच्या वापरामुळे बदलते ग्रामीण जीवन प्रत्ययकारी झालेले दिसते. वहानांचा विशिष्ठ आवाज शब्दात पकडल्यामुळे एकप्रकारची लयबद्दता निर्माण झालेली दिसते. ग्रामीण बोलीभाषेचे वेगळेपण या कादंब-यात सतत जाणवते.

या कादंब-यातील स्त्रियांचे जीवन वैशिष्ट्यपूर्ण आहे. बदलत्या ग्रामीण जीवनातही स्त्रिया शिक्षणापासून दूर राहिलेल्या दिसतात. या कादंब-यात विधवा, परित्यक्ता, दलित शेतमजूर स्त्रियांच्या जीवनाचे चित्रण आलेले आहे. पिढयानपिढया स्त्रियांच्या वाटयाला आलेले दु:खाचे स्वरूप येथेही जाणवते. राजकारणाचा परिणाम स्त्रियांच्या जीवनावर होऊ लागल्याचे येथे जाणवते.

शकू किंवा राजीसारख्या तरुण स्त्रिया राजकारणाचा बळी ठरलेल्या दिसून येतात. स्त्रियांच्या जीवनाशी राजकीय डावपेच लढले गेलेले दिसतात. या राजकीय खेळीमुळे स्त्रियांचे जीवन उद्‌ध्वस्त झालेले दिसते. यापेक्षाही दलित स्त्रियांचे जीवन जाणवते. दुःख, दारिद्रय, अवहेलना या स्वरूपातच त्यांना जगावे लागत आहे. दररोज कष्ट केल्याशिवाय पोटाला अन्न मिळत नाही. अशी अवस्था दिसते.

ग्रामीण भागातील स्त्रियांचे जीवन पाहताना सतत जाणवते ते त्यांचे अस्तित्वहीन जगणे. गावच्या विकासप्रक्रियेचा लाभ स्त्रियांना होत नाही. राजकारणातही त्यांचे फक्त नावाला अस्तित्व असते. तरुण मजूर स्त्रियांच्या असुरक्षिततेचे वातावरण तयार होते. विविध स्वरूपात स्त्रियांच्या जीवनाचा कोंडमारा होत असलेले चित्र यांच्या कादंबऱ्यात दिसून येते.

पाटील यांच्या दोन्ही लघुकादंबऱ्यात आलेला निसर्ग आपले वेगळेपणा घेऊन साकार झालेला दिसतो. ग्रामीण जीवन आणि तेथील निसर्ग यांचे एकजीवपण झालेले जाणवते. बदलत्या ग्रामीण परिसरात निसर्गातील रुक्षपणा जाऊन नवे चैतन्य निर्माण झालेले दिसते. त्याप्रमाणे ग्रामीण जीवनातही नवे चैतन्य निर्माण झालेले दिसून येते. उसाची वाढती बागायती, फळांच्या बागा यामुळे ग्रामीण परिसरातील निसर्गाला बहर आलेला दिसतो. या बागायतीमुळे शेतकऱ्यांच्या जीवनाला वळन देण्याचे कार्य केलेले दिसते.

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खोदेपालट" या दोन्ही लघुकादंबऱ्याचा अभ्यास करताना अनेक वैशिष्ठ्ये दिसून येतात. लघुकादंबरीची वैशिष्ट्ये या दोन्ही कादंबऱ्यात प्रकर्षाने जाणवतात. कथानकाचा आवाका कादंबरीतील घटना,प्रसंग, वातावरण निर्मिती यामुळे या कादंबरीला लघुत्व प्राप्त झालेले आहे. परंतु कादंबरीच्या कथानकात काही तपशिल भरपूर आलेले आहेत. लघुकादंबरीच्या तंत्राची म्हणून जी वैशिष्ठये आहेत ती पाटील यांच्या कादंबऱ्यात दिसून येतात.

.....

## प्रकरण चौथे

### संदर्भसूची


१) पवार, गो.मा. - "दैनिक पुढारी", कोल्हापूर.
दिनांक १७.८.९१.

२) हातकणंगलेकर, म.द.- "दैनिक पुढारी", कोल्हापूर,
दिनांक १७.८.९१

३) भावे, पुष्पा - "दैनिक महाराष्ट्र टाइम्स",
रविवार, ८ सप्टेंबर, १९९१.

४) गवस, राजन - "प्रादेशिक आणि ग्रामीण कादंबरी"
(१९७५ ते १९९०)
गोवा, चर्चासत्रात वाचलेला अप्रकाशित निबंध.


......